**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क. ०१ चा शपथेवर सरतपास –</u>**
**<u>वकील श्रीमती वाय. एस. मस्करे यांचेमार्फत –</u>**

मी देवाची शपथ खरे सांगते की,

माझे नाव : दुर्गा दयाशंकर खुरसांगे,
वय : २३ वर्षे, व्यवसाय : काही नाही,
राहणार : मोंढा, तह. हिंगणा, जि. नागपूर.

१. मला आता दाखविलेला दस्त हा माझे व गैरअर्जदाराचे लग्नाची पत्रीका आहे. ती खरी व बरोबर आहे. ती **लग्नपत्रिका नि.क.१७** प्रमाणे आहे. मला आता दाखविलेला जन्म दाखल्याची प्रत माझा मुलगा रूद्र उर्फ दक्ष दयाशंकर खुरसुंगे याच्या जन्म नोंदीचा दाखला आहे. तो खरा व बरोबर आहे. मला आता दाखविलेला जन्म दाखल्याची प्रत माझी मुलगी संजना दयाशंकर खुरसुंगे हिच्या जन्म नोंदीचा दाखला आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर दोन्ही मूळ दाखले आज मी सोबत आणले आहेत. ( वरील दस्तांना निशाणी क्रमांक देण्यास गैरअर्जदाराचे वकीलांनी आक्षेप नोंदविण्यात आला की, जन्म मृत्य नोंद अधिनियम कलम १९, २० आणि २२ च्या तरतूदींची पूर्तता झाली नाही व त्यामुळे सदर प्रमाणपत्रांना निशाणी क्रमांक देण्यात येवू नये. गैरअर्जदार यांच्या वकीलांच्या आक्षेपांना अधीन राहून सदर दस्तांना ओळखण्याकरिता निशाणी देण्यात येते.) सदर दस्तांना नि.क्र १८ व १९ देण्यात येत आहे. मला आता दाखविलेला दस्त हा मी पोलीसांना दिलेल्या पोलीस रिपोर्टची स्थळप्रत आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. वरील दस्तास निशाणी क्रमांक देण्यास गैरअर्जदाराचे विद्वान वकीलांनी आक्षेप नोंदविण्यात आला की, सदर दस्त पब्लीक दस्त नाही व तो कलम ७४ भारतीय पुरावा कायदा च्या कक्षेमध्ये बसत नाही. अर्जदाराच्या कथनानुसार तिने नोंदविलेल्या तक्रारीची स्थळप्रत आहे.) परिणामी सदर दस्ताला **नि.क २०** देण्यात येत आहे. मला आता दाखविलेला दस्त मी गैरअर्जदाराविरूध्द नोंदविलेल्या एन.सी. ची कार्बन कॉपी आहे. त्यावर माझी

सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (वरील दस्तास निशाणी क्रमांक देण्यास गैरअर्जदाराचे विद्वान वकीलांनी आक्षेप नोंदविण्यात आला की, सदर दस्त पब्लीक दस्त नाही व तो कलम ७४ भारतीय पुरावा कायदा च्या कक्षेमध्ये बसत नाही. अर्जदाराच्या कथनानुसार तिने नोंदविलेल्या तक्रारीची स्थळप्रत आहे.) परिणामी सदर दस्ताला **नि.क २१** देण्यात येत आहे.

२. दि.०६.१०.२०१३ रोजी माझे लग्न गैरअर्जदारासोबत झाले. मला एक मुलगा व एक मुलगी आहे. माझे मुलीचा जन्म दि.०९.०२.२०१३ रोजी झाला व मुलाचा जन्म दि.२५.१२.२०१४ रोजी झाला. मला माझे गैरअर्जदारासोबत लग्न होण्याच्या पूर्वी गैरअर्जदारापासून एक मुलगी होती. मी लग्नानंतर गैरअर्जदाराच्या घरी नांदण्यास गेली. गैरअर्जदाराच्या आईला माझे व गैरअर्जदाराचे लग्न मंजूर नव्हते. गैरअर्जदाराची आई मला आमच्या घरी नांदू नको असे म्हणत होती व शिवीगाळ करीत होती. माझी सासू माझी सून माझ्या घरी नको असे म्हणत होती. गैरअर्जदाराने माझा दोन वेळा गळा दाबला. माझे बाळंतपण माझे माहेरी झाले. माझी मुलगी एक वर्षाची झाल्यानंतर मी गैरअर्जदाराच्या घरी गेली. माझी मुलगी सहा महिन्यांची असताना व मुलगा एक वर्षांचा असताना मी माझे आईच्या घरी आले. गैरअर्जदार मला परत घेण्यास पुन्हा आला नाही. गैरअर्जदाराने दुसरे लग्न केले. त्याच्या दुस-या लग्नाबाबत मला माहीती नव्हते. नंतर मी गैरअर्जदाराविरूध्द पोलीस स्टेशनला रिपोर्ट नोंदविला. पोलीसांनी मला कोर्टामध्ये जाण्यास सांगितले. गैरअर्जदाराने त्याच्या गावी जुनेवाणी, तह. तिरोडी, जि. गोंदिया येथे दुसरे लग्न केले. मी तीन वर्षांपासून माझे माहेरी राहत आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>गैरअर्जदारातर्फे साक्षीदार क. ०१ चा उलटतपास –</u>**
**<u>वकील श्री. डी.ए. गोल्हर यांचेमार्फत –</u>**

१. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्नामध्ये लग्न मंडपाचे डेकारेशन, मामाने अंतरपाट घालणे व मंगलाष्टके अशी प्रचलीत प्रक्रिया झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे लग्न झाले हे दाखविण्यासाठी लग्नाचे फोटोग्राफ

दाखल केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, कपडे लत्त्याचे देण्याघेण्याचा कार्यक्रम माझे लग्नात झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ते दर्शविण्याकरिता मी कपड्या लत्त्यांची बील सादर केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी लग्नातील आंदणाची यादी बनविली नव्हती. तसे झालेले नसल्यामुळे मी तशी यादी आंदणाची यादी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे लग्न लागले असे दाखविण्यासाठी मी एकही फोटोग्राफ दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेमध्ये लग्नाची कोणतीही नोंद घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आधारकार्ड, रेशनकार्ड अथवा मतदान कार्ड माझे गैरअर्जदारासोबत लग्न झाले हे दाखविण्याकरिता दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, समाजातील चालीरीतीप्रमाणे मी लग्न केले नसल्यामुळे मी तसे पुरावे दाखल केलेले नाहीत.

२. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या लग्नाच्या पत्रिकेवर प्रिंटरचे नाव / मुद्रण नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर पत्रिका किती छापल्या व कुणी छापल्या हे दाखविण्याकरिता मी छापल्याचे बील दाखल केले नाही. सदर पत्रिका कुठे छापल्या हे मला माहीत नाही. सदर पत्रिका माझे दादाने छापून आणली होती. प्रफुल राखुंडे या माझे दादाने पत्रिका छापून आणली होती. तो माझा मानलेला भाउ आहे. सदर पत्रिका दादाने कोठून छापून आणली याचा मी आजपर्यंत शोध घेतला नाही. लग्नाच्या पत्रिका निश्चीत किती छापल्या होत्या हे मला माहीती नाही. माझे दादाने छापलेल्या पत्रिका बनावट आहेत.

३. माझा अर्जामध्ये नमूद केलेला आधार कार्ड क्रमांक माझे वडीलांच्या माहेरकडील नावाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९ वरील जन्म दाखल्यामध्ये गैरअर्जदाराचा आधार कार्ड क्रमांक नमूद नाही. माझी मुलगी अर्जदार क्र. ३ संजना हिचा जन्म लता मंगेशकर हॉस्पीटल नागपूर येथे झाला. गैरअर्जदाराच्या नावाचे संजना हिचे जन्माचे नोंदणीकरिता कोणता दस्त जोडला होता हे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हा दवाखान्यामध्ये आला नसल्यामुळे त्याचा कोणताही दस्त दाखल करू शकले नाही. गैरअर्जदार दवाखान्यामध्ये आला होता व त्याच्या नावाचा दस्त मी दाखल

केला होता हे दर्शविणा-याकरिता कोणताही दस्त मी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदाराने दवाखान्यामध्ये येवून त्याचे नाव संजना हिच्या जन्म नोंदीसाठी वापरण्याकरिता लेखी संमती दिली असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा दक्ष याच्या जन्माच्या नोंदीकरिता गैरअर्जदार याने दवाखान्यामध्ये कोणताही फॉर्म भरला अथवा संमती दिली हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे ओ की, सदर दोन्ही जन्माच्या नोंदी दवाखान्यात माझे सांगण्यानुसार करण्यात आल्या. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्नाच्या आठ महिन्याअगोदर मुलगी संजना हिचा जन्म झाला. मी लग्नाच्या पूर्वी गैरअर्जदाराने मुलीच्या संजनाच्या जन्माच्या नंतर लग्न करण्यास नकार दिला या कारणाने मी त्याच्याविरूध्द पोलीसांकडे तक्रार केली नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार याने माझा गळा दाबला व मी वैद्यकीय उपचार घेतला हे दाखविण्याकरिता मी कोणतेही कागदपत्री पुरावा दाखल केला नाही. संजनाचा जन्म लग्नानंतर झाला हे बरोबर आहे हे माझे अर्जातील कथन बरोबर आहे. साक्षीदार पुन्हा सांगते की, संजना हिचा जन्म लग्नापूर्वी ६ महिने आधी झाला. संजना हिचा जन्म लग्नानंतर झाला हे चुकीचे आहे. त्यामुळे माझे अर्जामधील परि.क्र.१ मधील मजकूर म्हणजे संजना हिचा जन्म लग्नापासून झाला हे चुकीचे आहे. माझे अर्जातील परि.क्र.३ मधील मजकूर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वकीलांनी ज्यानुसार केस बनविली त्यानुसार मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार व त्याची आई मला पैसे मागत होती हे दाखविण्याकरिता कोणताही कागदोपत्री पुरावा व शासनाचा कोणताही अवार्ड दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे मुलांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमांना गैरअर्जदार हजर होता हे दर्शविणारा कोणताही फोटोग्राफ मी दाखल केलेला नाही.

५. मी पोलीसांकडे रिपोर्ट देण्यास गेली त्यावेळी पोलीस मला लग्नाचा पुरावा मागत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना त्याबाबत पुरावा न दिल्यामुळे गैरअर्जदाराविरूध्द खटला दाखल झाला नाही. मी पोलीसांना लग्नाचा पुरावा दिला नव्हता. त्यामुळे पोलीसांनी गैरअर्जदाराविरूध्द कोणतीही कार्यवाही

केली नाही.

६ हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार दयाशंकर हा हिंगणा येथे राहतो. गैरअर्जदाराचे आईवडील गोटाडी या गावी राहतात. हे म्हणणे खरे नाही की, माझे व गैरअर्जदार याचे पतीपत्नीचे कोणतेही संबंध नाहीत. हे म्हणो खरे नाही की, गैरअर्जदाराचे पती म्हणून माझेकडे कोणतेही येणेजाणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क. २ व ३ हे गैरअर्जदाराचे मुलं नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्हाला गैरअर्जदाराकडून पोटगी मागण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराला खोट्या केसमध्ये फसवून दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले सर्व दस्ताऐवज हे बनावट व अवैध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदाराने लग्न केलेले आहे. गैरअर्जदाराला त्याच्या सदर लग्नापासून मुलगा आहे की मुलगी आहे हे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराच्या नातेवाईकांकडून माहीती घेवून खोटी लग्नपत्रिका छापली व त्याच्यावर खोटे आरोप केलेत. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराविरूध्द खोट्या तकारी केल्या. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार व त्याच्या आईविरूध्द केलेले आरोप हे निखालस खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

माझे समक्ष,

हिंगणा.
दि.०३/०८/२०१८.

स्वा/-
( ए.जी. देशमुख )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
हिंगणा